# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सोलापूर जिल्हयात अनेक गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(१) ४५९७७ (१३-०५-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात माहे जानेवारी मध्येच उजनी जलाशय मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प व कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांमधील पाणीसाठा वजा ६.८५ टक्के असून जिल्हयातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची टंचाई असताना नागरीकांवर आली असताना शासनाच्या जाचक अटींमुळे टँकरची मागणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी टंचाईचा विचार करता तातडीने टँकर पुरवठा जिल्हयासाठी करुन जाचक अटी शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हयातील काही गावात पाणी टंचाई असल्याने माहे जानेवारी, २०१६ मध्ये ९ गावे व ५ वाडयांवर १० शासकीय टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला होता. तसेच आवश्यक तेथे अन्य उपाययोजनांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१४/प्र.क्र.२५८/म-७, दि.३१.०१.२०१५ नुसार विभागीय, आयुक्त पुणे यांच्या दि.०२.०१.२०१६ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना असलेले टँकर मुजूरीचे अधिकारी तहसिलदार यांना प्रदान करएयात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंडीगाव (ता.डहाणू) या गावातील ग्रामपंचायतीचा कारभार लोकशाही मार्गाने करण्याबाबत**

**(२) ५२६४४ (०२-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंडीगाव (ता.डहाणू) हे दहा सदस्य असलेले गाव असून तेथील ग्रामपंचायतीच्या सरपंचाची जागा आदिवासी समाजासाठी आरक्षित आहे परंतु आदिवासी समाजाचे पात्र उमेदवार मिळत नसल्याने तेथे अनेक वर्षे निवडणूक होऊ शकली नसल्यामुळे सदरहू ग्रामपंचायतीचा कारभार शासनाकडूनच सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ गावात जर आदिवासी समाजाचा उमेदवारच मिळत नसेल तर ही ग्रामपंचायत इतकी वर्षे आदिवासी समाजासाठी आरक्षित ठेवून लोकांचे व गावांचे नुकसान करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींच्या विकासासाठी व अठरापगड जातीच्या ग्रामस्थांच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी आरक्षण ऐवजी अन्य न्याय मार्ग शोधून या ग्रामपंचायतीचा कारभार लोकशाही मार्गाने होण्यासाठी कोणती उपाययोजना शासनाने केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) सदर ग्रामपंचायत अनुसूचित क्षेत्रात येत असून पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम, १९९६ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या निम्म्यापेक्षा जास्त जागा अनुसूचित जमातीसाठी ठेवाव्या लागतात. तसेच अनुसूचित क्षेत्रात येणा-या ग्रामपंचायतीचे सरपंच पद अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवावे लागते.

सदर ग्रामपंचायतीमधून अनुसूचीत जमातीचे उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामपंचायत गठीत होऊ शकलेली नाही. तथापि, सदर ग्रामपंचायतीच्या लोकांचे नुकसान व गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामपंचायतीचा कारभार गट विकास अधिकारी, पंचायत समिती डहाणू यांचेमार्फत प्रशासकाची नेमणूक करुन चालविल्या जात आहेत.

(३) राज्यात, अनुसूचित क्षेत्राचा समावेश करणे किंवा अनुसूचित क्षेत्र वगळणे ही बाब मा. राष्ट्रपती महोदयांच्या अखत्यारीतील बाब आहे. तथापि, सदर ग्रामपंचायत अनुसूचित क्षेत्रातून वगळण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन तो आदिवासी विकास विभाग व मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयामार्फत मा. राष्ट्रपती महोदयांच्या विचारार्थ पाठविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (नाशिक) येथे बसविण्यात आलेल्या सौरदिव्यामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३) ५७८०७ (२३-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (नाशिक) येथील ग्रामपंचायतीनी १०% रक्कम भरल्यानंतर यात शासनाच्या कृषी विभागाकडून ९० % अनुदान देऊन बसविण्यात आलेले सौरदिवे काही दिवसात बंद पडल्याने यात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित अधिका-यांकडे तक्रार करुन देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) : (**१) व (२) नाही.

तथापि नाशिक जिल्हयात येवला तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (बिगर आदिवासी) या योजनेंतर्गत ९०% अनुदानावर १९ ग्रामपंचायतीमार्फत एकूण १७० सौर पथदिवे बसविण्यात आले आहेत. यापैकी सद्यस्थितीत १५२ सौरपथदिवे चालू स्थितीत असून १८ सौरपथ दिवे बंद आहेत.

सदर योजनेतील अटी वशर्तीनुसार सौर पथदिवे पुरवठा करणा-या पुरवठादार संस्थेने सौर पथदिवे संचाची उभारणी करून कार्यान्वीत केल्यानंतर पुढील ५ वर्षाकरिता संचाची देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक आहे त्यानुसार बंद असलेले सौरपथदिवे दुरुस्ती करण्याबाबत संबंधित पुरवठादारास कळविण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**बीड जिल्हयातील आष्टी, पाटोदा व शिरूर येथील सुमारे १० पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) ६२३९९ (२३-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील आष्टी,पाटोदा व शिरूर येथील सुमारे १० पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पर्यटन योजनेतून शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणच्या पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासनाने निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०२-२०१९) : (**१) हे खरे नाही. बीड जिल्हयातील आष्टी, पाटोदा व शिरुर येथील सुमारे १० पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पर्यटन योजनेतून निधीची मागणी करण्याबाबत प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत  नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**रायगड जिल्हा परिषदेच्या विकास कामांची चौकशी करून शासनाच्या निधी वाटपाचे आदेश रद्द करण्याबाबत**

**(५) ६५११० (२७-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागाकडून ३३ कोटी रूपयांच्या विकास कामाचे विभाजन  करुन शासनाच्या ई टेंडरीग आदेश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वत:हून विकास कामांची चौकशी करून निधी वाटपाचे आदेश तात्काळ रद्द करावेत अशी मागणीचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रायगड, आयुक्त, कोकण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)  नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०१-२०१९) : (**१) अंशत: खरे आहे.

(२) लोकप्रतिनिधींचे निवेदन क्षेत्रिय स्तरावर प्राप्त झालेले दिसते तथापि ग्रामविकास विभाग कार्यालयात अद्‌याप प्राप्त झालेले दिसत नाही.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. रायगड यांना याप्रकरणी चौकशीअंती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आवश्यक ती शिस्तभंग विषयक कारवाई करण्याबाबत शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**वाघेरी (ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग) गावातील अतिधोकादायक झालेल्या साकवाचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(६) ८०२५३ (१४-०४-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील किती साकव अत्यंत धोकादायक झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाघेरी (ता.कणकवली,जि.सिंधुदुर्ग) गावातील अतिधोकादायक झालेला साकव निधी उपलब्ध झालेला असतांनाही बांधकाम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार धोकादायक साकव नवीन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) : (**१) साकव अत्यंत धोकादायक झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि काही साकवांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर गावामध्ये नवीन साकव बांधण्यासाठी निधी प्राप्त झालेला नाही. तथापि या गावातील ओहोळावर जून्या साकवापासून सुमारे १०० मीटर अंतरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवीन आर.सी.सी. साकव बांधण्यात आला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हा परिषदेच्या रुग्णालयात गेल्या अनेक वर्षापासून परिचारकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(७) ८५९०८ (११-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेच्या रुग्णालयात गेल्या अनेक वर्षापासून परिचारकांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा शासकिय रुग्णालयात ९५ परिचारिकांची पदे असून त्यातील ७८ परिचारिका कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही.
(२) अधिपरिचारिकांच्या ९५ पदांपैकी ७२ पदे भरलेली अाहेत व त्या व्यतिरिक्त १७ पदे कंत्राटी तत्वावर भरलेली आहे.

(३) वित्त विभागाच्या दि. १६ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेले निर्बधं उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतीबंधानुसार १००टक्के पदभरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सागुंळवाडी-नावडे या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(८) ८६५२३ (१८-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सागुंळवाडी-नावडे या रस्त्यांचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाले असून या रस्त्यासाठी ३ कोटी ६० लाख रूपयांचा निधीही मंजूर झाला असून सदरहू काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व धिम्यागतीने सुरू असल्याने तेथील ग्रामस्थांनी कामकाज बंद पाडण्याचा माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान इशारा दिला आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास,सदरहू रस्त्यांच्या व रस्त्यावरील काजवेच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत ग्रामस्थांनी अनेक प्रश्न उपस्थित केले असून दिनांक २६ जानेवारी, २०१७ च्या ग्रामसभेमध्ये या रस्त्यांचे काम दर्जेदार होण्यासाठी एक समितीही स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास,सदरहू कामाच्या दर्जाबाबत तसेच कामांच्या गतीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीनुसार सदरहू काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) : (**१)अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर कामाला होणाऱ्या विलंबाबाबत संबंधित कंत्राटदारास काम शिघ्र गतीने व निविदा अटि शर्तीनुसार सुरु करुन मुदतीत काम पुर्ण करण्याच्या कार्यकारी अभियंता,सिंधुदूर्ग कार्यालयाने सुचना दिल्या आहेत. सदर रस्त्याच्या कामास राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी भेट दिली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

---

**खामगाव (जि. बुलढाणा) तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९) ९४८९० (२७-१०-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती खामगाव (जि. बुलढाणा) अंतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्राम सेवकाला ३-३ गावाचा अतिरिक्त भार दिल्यामुळे त्यांच्या मूळ गावाची विकास कामे प्रलंबित राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शेतकऱ्यांना बँकाचे कर्ज काढण्याकरिता शासनाचे व इतर दाखले मिळण्यासाठी त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामसेवकाच्या परीक्षा पूर्ण होऊनसुद्धा त्यांना नियुक्त्या दिल्या नसल्याने ग्रामसेवकांच्या नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) जिल्हा परिषद बुलढाणा मध्ये खामगाव पंचायत समिती अंतर्गत ग्रामसेवक संवर्गाची ६८ मंजूर पदे असून त्यापैकी ६३ पदे भरलेली व ५ पदे रिक्त आहेत.

(२) नाही. ५ रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार ५ ग्रामसेवकांकडे देण्यात आला. तथापि, त्यामुळे ग्रामसेवकाची मुळ गावची कामे प्रलंबित नाहीत.

(३) नाही. शेतक-यांना बँकेचे कर्ज काढण्यासाठी इतर दाखले देणे ही बाब महसुल विभागाशी संबंधीत आहे.

(४) दिनांक ०९/११/२०१४ व ०२/१२/२०१५ च्या सरळसेवा भरतीमधून अनुक्रमे ५ व ४ कंत्राटी ग्रामसेवक तसेच सन २०१५ पासून आंतरजिल्हा बदलीने ५ ग्रामसेवक असे एकूण १४ ग्रामसेवकांची पंचायत समिती, खामगाव येथे पदास्थापना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा पंचायत समिती (जि. बुलढाणा) नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(१०) ९६०४८ (०६-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा पंचायत समिती (जि. बुलढाणा) नवीन इमारत बांधकामाचा त्रृटीच्या पुर्ततेसहचा प्रस्ताव दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद बुलढाणा यांच्याकडून प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीची नवीन इमारत बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , पंचायत समिती बुलढाणाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यासह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) जिल्हा परिषदेने सादर केलेल्या प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटी जिल्हा परिषदेला कळविण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषदेकडून त्रुटींच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर
निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) पंचायत समिती सभापती व अधिकारी कर्मचारी यांच्या निवासस्थानांच्या इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(११) ९६१०७ (०३-०१-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) पंचायत समिती सभापती व अधिकारी-कर्मचारी यांच्या निवासस्थानांच्या इमारतीच्या बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी दि २७ मार्च, २०१७, रोजी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असल्याने सदर इमारतींना प्रशासकीय मान्यता देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेकडून दिनांक २७.०३.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावातील त्रुटी जिल्हा परिषदेला कळविण्यात आलेल्या आहेत. सदर त्रुटींच्या पुर्ततेसह दिनांक १५.०६.२०१८ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून छाननी अंती तसेच, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामसेवकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ९९०२४ (०३-०१-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामसेवकांची गेल्या कित्येक वर्षापासून रिक्त पदे भरण्यात न आल्यामुळे अनेक ग्रामपंचायतींची विकासकामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीअंतर्गत ७४ ग्रामपंचायती असून या ग्रामपंचायतींचे कामकाज केवळ ४६ ग्रामसेवक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही,

पंचायत समिती पांढरकवडा येथे ग्रामसेवकांची ६० पदे मंजूर असून त्यापैकी ५० पदे भरण्यात आलेली आहेत तसेच ग्रामविकास अधिकारी यांची ४ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली आहेत.

(३) व (४) वित्त विभागाच्या दि. १६ मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेले निर्बधं उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतीबंधानुसार १०० टक्के पदभरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील आमठाणा ते अंधारी या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१३) १०२६९२ (०४-०१-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) या तालुकयातील आमठाणा ते अंधारी या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) सदर रस्त्याची पाहणी करण्यात आलेली असून सदर रस्त्याच्या काही भागात काही प्रमाणात खड्डे पडलेले आहेत.

(३) सन २०१६-१७ मध्ये कि.मी.०/००० ते १५/५०० पर्यंतचा रस्ता विशेष दुरुस्तीअंतर्गत नुतनीकरण करण्यात आला आहे. सन २०१८-१९ मध्ये कि.मी.१५/५०० ते २१/४०० पर्यंतचा रस्ता दुरुस्तीसाठी हाती घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**सालेकसा (जि. गोंदिया) येथील पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(१४) १०३६३२ (०६-०१-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि. गोंदिया) येथील पंचायत समितीच्या कर्मचारयांच्या वसाहतीला ४० वर्षे पूर्ण होऊन देखील या जुन्या वसाहतीची दुरुस्ती व पुनर्विकास न झाल्यामुळे तेथील वास्तव्यास असलेल्या कर्मचा-यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याने या जीर्ण झालेल्या वसाहतीची दुरुस्ती करण्याची मागणी तेथील रहिवाशांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार धोकादायक व मोडकळीस आलेल्या वसाहतीची दुरुस्ती व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासनाच्या देखभाल- दुरुस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत गोंदिया जिल्हा परिषदेकरीता सन २०१७-१८ या वर्षामध्ये रु. ३५.५६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून चालु आर्थिक वर्षात या लेखाशिर्षाअंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.

सदर उपलब्ध निधीच्या मर्यादेत प्राधान्याने आवश्यक दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेमार्फत हाती घेवून पुर्ण करण्यात येणार आहे.

(४)  प्रश्न उद्भवत  नाही.

---

**कोल्हापूर जिल्हापरिषदेची मुख्य प्रशासकीय इमारतीच्या चौथ्या मजल्याच्या बांधकामास परवानगी मिळणेबाबत**

**(१५) १०५४८५ (०७-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील काम वाढल्यामुळे जागेची टंचाई निर्माण झाली असल्याने मुख्य प्रशासकीय इमारतीच्या चौथ्या मजल्याच्या बांधकामास परवानगीचा प्रस्ताव गेले कित्येक दिवस मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर बांधकामाला परवानगी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) कोल्हापूर जिल्हा परिषद मुख्य प्रशासकीय इमारतीच्या चौथ्या मजल्याच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पंचायत समितीसाठी नवीन इमारत बांधण्याबाबत**

**(१६) १०५४८७ (०४-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पंचायत समितीचे बांधकाम हे जागा उपलब्ध नसल्याने गेले कित्येक दिवस प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार जागा उपलब्ध करून निधीची तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

करवीर पंचायत समिती इमारत बांधकामाकरीता प्रस्तावित असलेली शेंडापार्क, कोल्हापूर येथील जागा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ताब्यात आहे. सदर जागा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत

करुन घेण्यासाठी मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांच्याकडे दिनांक २०.०५.२०१४ च्या पत्रान्वये मागणी
प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. अद्याप जागा हस्तांतरीत झालेली नाही. जागा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्र.जि.मा.१८ ते राणेवाडी किल्ले बुदरगड (ता.राधानगरी,जि.कोल्हापूर) च्या विशेष देखभाल व दुरुस्तीस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(१७) १०६४४४ (०५-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्र.जि.मा.१८ ते राणेवाडी किल्ले बुदरगड ता.राधानगरी जि. कोल्हापूर हे विशेष देखभाल व दुरुस्ती सन २०१७-१८ प्रस्तावित असून अदयाप सदरच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता देऊन काम त्वरीत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) : (**१) हे खरे नाही. सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

(२) सदर कामाची निविदा मंजूर झाली असून दि.१८.०७.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती बसमत, जिल्हा हिंगोली येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) १०६४४६ (०७-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती बसमत, जिल्हा हिंगोली येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

बसमत पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी रु. २७१.८२ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी जिल्हा हिंगोली येथील पंचायत समितीची प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्तावाबाबत**

**(१९) १०६४४७ (०५-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी जिल्हा हिंगोली येथील पंचायत समितीची प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास त्वरीत मंजूरी देऊन प्रशासकीय इमारतीचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पंचायत समिती कळमनुरी जिल्हा हिंगोली नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास वाढीव निधी उपलब्ध झाल्यानंतर प्राथम्यक्रमानुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौजे कोरेगाव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथील पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२०) १०७०२० (०९-०४-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरेगाव (ता.कोरेगाव,जि.सातारा) येथील पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याच्या प्रस्तावास ग्रामविकास विभागाने शासन निर्णय दिनांक १६ डिसेंबर,२०१५ अन्वये २५.१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१ या शिर्षकाअंतर्गत शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्रशासकीय मान्यता देऊनही अद्यापी इमारतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर इमारत तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

कोरेगाव पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या रुपये ३८४.०० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक २७.०२.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) इमारत बांधकामाच्या जागेत बदल झाल्यामुळे कामास सुरुवात करण्यात आली नाही.
(३) व (४) कोरेगाव पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामास शासन निर्णय दिनांक २७.०२.२०१२ अन्वये दिलेली रुपये ३८४.०० लक्ष किंमतीची प्रशासकीय मान्यता रद्द करुन जिल्हा परिषदेने दि. ११.०१.२०१७ रोजी नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाबाबत प्रशासकीय इमारतीच्या चालू बांधकामांना निधी देण्याचे

---

**नाशिक जिल्हा परिषदेत नोकरभरतीत झालेला गैरव्यवहार**

**(२१) १०७६८० (०५-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेत नोकरभरतीत गैरव्यवहाराबाबत करण्यांत येत असलेली चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, चौकशी अहवालाची सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) सन २०१६ पासून सन २०१८ पर्यंत जिल्हा परिषद नाशिकमध्ये नोकर भरती झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वर्ग १ व २ तसेच वर्ग 'क' व 'ड' ची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) १०८२१५ (२८-०३-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये वर्ग १ व वर्ग २ व्या एकूण १२७ जागा, वर्ग 'क' व 'ड' च्या एकूण ३९४ जागा बऱ्याच वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहु जागा भरती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) व (२) उस्मानाबाद जिल्हा परिषदेतील महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-१ संवर्गातील सर्व मंजूर पदे भरण्यात आली असून, वर्ग-२ संवर्गातील मंजूर पदांपैकी २ पदे रिक्त आहेत.

तसेच,महाराष्ट्र विकास सेवा वगळून वर्ग -१ संवर्गातील १७ व वर्ग-२ संवर्गातील ०७ पदे रिक्त आहेत. तसेच वर्ग-३ संवर्गातील २८७ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ ची पदे भरण्याबाबत शासनस्तरावरून कार्यवाही सूरू आहे. महाराष्ट्र विकास सेवा वगळून जिल्हा परिषदेतील इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे संबंधित प्रशासकीय विभागामार्फत निर्माण करण्यात आली असून सदर पदे संबंधित विभागाकडून भरली जातात. जिल्हा परिषदेतील उक्त अधिकाऱ्यांची सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच, जिल्हा परिषदेतील "क" व "ड" संवल रिक्त पदभरती वरील निर्बंध, दि.१६ मे,२०१८ च्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आल्याने, सदरहू पदे जिल्हा निहाय स्तरावर भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) येथील पंचायत समिती कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(२३) १०९५३२ (२८-०३-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) येथील पंचायत समितीच्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्यास सन-२०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावल पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम करण्यास अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर इमारतीचे बांधकाम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) यावल पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास शा.नि. दिनांक ३१.०३.२०१७ अन्वये रु. २७०.७८ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

यावल पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता अधिक्षक अभियंता सा.बां. मं. जळगाव यांच्याकडून दिनांक १५.१२.२०१७ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली असून या कामाकरीता मार्च २०१८ मध्ये रु. २०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०१८-१९ मध्ये ई-निविदा कार्यवाही करुन बांधकामास सुरुवात करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्वमालकीची इमारत असलेल्या ग्रामपंचायताना दुरुस्तीसह स्वमालकीचा ग्रामसभा हॉल बांधण्याकरिता निधीची तरतूद करणेबाबत**

**(२४) ११००७४ (२८-०३-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे जानेवारी २०१८ वा त्या दरम्यान राज्यात ज्या ग्रामपंचतींची इमारत स्वमालकीची नाही अश्या ग्रामपंचायतीना स्वमालकीची इमारत व्हावी याकरिता मंत्रीमंडळ बैठकीत स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजना सुरू करण्यास मान्यता दिली असून जिल्हा रत्नागिरीमधील दापोली, मंडणगड व खेड या तालुक्यात असलेल्या अनेक ग्रामपंचायतीच्या स्वमालकीच्या इमारतीमध्ये जागा कमी पडत असल्याने ग्रामसभा घेणे, ग्रामपंचायत कारभार नियोजनबध्द चालणे अश्या अनेक महत्वाच्या कामांना अडथळा निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनतेच्या महत्वाचे जनहितार्थ निर्णय घेण्यासाठी सदरच्या ग्रामपंचायतीकडे ग्रामसभेकरिता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अनेक ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेत कोणकोणते निर्णय झाले अथवा ग्रामस्थांना आपली बाजू मांडण्यास अडचण निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार स्वमालकीची ग्रामपंचायत इमारत असलेल्या ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालय तसेच ग्रामसभा सभागृह बनविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(१) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री योजनेतून स्वतंत्र कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करता येणार आहे.

ग्रामपंचायतीसाठी स्वमालकीचा ग्रामसभा हॉल बांधण्याकरिता संबंधित लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यास, ग्रामपंचायतींना जन सुविधांसाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंचायत समिती महागाव (जि. यवतमाळ) नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत**

**(२५) ११०५२५ (२८-०३-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती महागाव (जि. यवतमाळ) नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतच्या त्रूटीची पूर्तता करुन सविस्तर व परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक १२ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, यवतमाळ यांच्या ग्रामविकास व जलसंधारण विभाग, अवर सचिव यांना कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सविस्तर व परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय तसेच या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेने दिनांक १७.०३.२०१८ रोजी सादर केलेला प्रस्ताव परिपुर्ण नसून यात आढळून आलेल्या त्रुटी दिनांक ३१.०७.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेला कळविण्यात आल्या आहेत.

सदर त्रुटींच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही. .

---

## हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या विविध विभागातील गट ‘अ’ व गट ‘ब’ संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(२६) ११०५९३ (०५-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदे मध्ये विविध विभागातील गट ‘अ’ व गट ‘ब’ संवर्गातील पदे मोठया प्रमाणावर मागील अनेक वर्षापासून रिक्त असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,हिंगोली जिल्हा परिषदेतील विविध विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी अशा आशयाच्या मागणीचे पत्र वैष्णवी घुगे जिल्हा परिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास राज्यमंत्री व प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग आदीकडे मागील १ वर्षापासून सातत्याने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर मागणीनुसार जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत असलेली सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत विविध संवर्गातील गट-अ व गट-ब ची एकूण ६९ पदे रिक्त आहेत. यामध्ये महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील तसेच महाराष्ट्र विकास सेवा वगळून इतर प्रशासकीय विभागाशी संबंधित पदांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेतील गट-अ व गट-ब मधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत या विभागाकडून सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना दि.२१.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. प्रस्तुत रिक्त पदे विहित मार्गाने भरण्याबाबतकार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी व सिंदेवाही येथे पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी निधीसह मान्यता मिळण्याबाबत

**(२७) ११०८४२ (०५-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही आणि ब्रम्हपूरी येथील पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव कार्यकारी अभिंयता, बांधकाम विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी प्रस्ताव क्रमांक बावि/पिओ-२/४२६१/२०१७ रूपये ६ कोटी ७६ लक्ष आणि बावि/पिओ-२/४२६०/२०१७ रूपये ६ कोटी ७६ लक्ष दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी नुसार ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झवान पथ फोर्ट मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही प्रस्तावास प्रत्येकी ६ कोटी ७६ लक्ष रूपये निधी मिळण्यासह दोन्ही प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडून सिंदेवाही आणि ब्रम्हपूरी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे परिपुर्ण प्रस्ताव दिनांक २९.११.२०१८ व दिनांक २६.११.२०१८ रोजी प्राप्त झाले असून सदर प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर शहरातुन प्रजिमा ९२ च्या कडेला बीओटी प्रकल्पातील वाणिज्य इमारतीचे बांधकाम विनापरवाना केल्याबाबत

**(२८) १११९५४ (१०-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) येथील पंचायत समितीच्या बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा (बीओटी) प्रकल्पातील व्यापारी इमारतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाची स्थळ पाहणी करुन त्वरीत अहवाल सादर करण्याचा आणि या इमारतीचे बांधकाम थांबविणण्याचा आदेश कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिरुर शहरातून प्रजिमा ९२ च्या कडेला बीओटी प्रकल्पातील वाणिज्य इमारत बांधुनसुध्दा इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदर इमारतीचे बांधकाम थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) जिल्हा परिषद बांधकामांतर्गत शिरुर बीओटी प्रकल्पास ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २२.०२.२०१३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, सदर प्रकल्पामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांचा भंग होत नसल्याने परवानगी घेण्याचा प्रश्न उद्भवत  नाही.
(२), (३),(४) व (५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**जिल्हा परीषद नाशिक येथे बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करुन नोकरी मिळविल्याबाबत**

**(२९) ११२६४३ (०९-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद नाशिक येथे दोन कनिष्ठ प्रशासन अधिका-यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करुन नोकरी मिळविल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे.जे. रुग्णालयाने संबधितांचे प्रमाणपत्र बनावट असल्याचे कळविले असतांनाही याच प्रमाणपत्रांच्या आधारे दिव्यांगांचे लाभ संबधितांनी मिळविले आहेत ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) नाही,

(२) नाही, संबधितांनी सदर प्रमाणपत्राच्या आधारे दिव्यंगाचे लाभ मिळविले नसून अपंग प्रमाण प्रत्राच्या आधारे बदलीचा लाभ घेतला आहे.

(३) याबाबत संबधितांकडून खुलासा मागविला असून प्राप्त खुलाशाच्या आधारे संबंधितांच्या अपंग प्रमाणपत्राची पुनश:खातरजमा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील पारोळा पंचायत समितीच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(३०) ११३९०८ (११-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील पारोळा पंचायत समितीची इमारतीची दुरवस्था झाली असून ती केव्हाही कोसळुन दुर्घटना होण्याची शक्यता असल्यामुळे त्या जागी नवीन इमारत बांधण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी व त्यानंतरही पत्रान्वये मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समितीच्या नवीन इमारतीचा परीपूर्ण प्रस्ताव (अंदाजपत्रक, नकाशासह) ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,पारोळा पंचायत समितीच्या इमारतीचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

पारोळा पंचायत समितीची अस्तित्वातील इमारत जुनी असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिनांक २७.०६.२०१५ रोजी सादर केल्याचे कळविले आहे. तथापि, सदरहु प्रस्ताव ग्राम विकास विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) पारोळा पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपुर्ण प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह शासनास खास दुताकरवी सादर करण्याबाबत दिनांक १८.०५.२०१६, २३.०६.२०१६ व दिनांक २२.०२.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषदेकडून अद्याप परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत १४ रिक्त पदांची पदस्थापना करण्याबाबत

**(३१) ११४२१३ (०६-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत १४ रिक्त पदांची पदस्थापना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (हिंगणघाट) दिनांक ४ मार्च,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास व मा.जलसंधारण मंत्री यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) सदर रिक्त असलेली पदे स्पर्धा परीक्षा/पदोन्नतीव्दारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**सरस्वती, तांबोळा, मातमळ, शिंदी, हिवराखंड, पिंपरी खंदारे, पिंपळखुटा, वढव (ता.लोणार, जि.बुलढाणा) या गावांमध्ये जाणा-या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३२) ११९४८० (३१-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरस्वती, तांबोळा, मातमळ, शिंदी, हिवराखंड, पिंपरी खंदारे, पिंपळखुटा, वढव (ता.लोणार, जि.बुलढाणा) या गावांमध्ये जाणा-या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर गावात जाणाऱ्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय. सदर रस्त्यांची पाहणी केली असुन रस्त्यांच्या दुरूस्तीची गरज असल्याचे आढळुन आले.

(३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत सन २०१७-१८ मध्ये रामा ५१ ते सरस्वती, तांबोळा, हत्ता, चिखला असे १०.५० कि.मी. लांबीचे काम मंजूर असुन सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

मातमळ, शिंदी, हिवराखंड, पिंपरी खंदारे या गावांना जोडणारा इजिमा १४५ ते मातमळ, शिंदी, हिवराखंड या ३.२० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दर्जोन्नतीचे काम प्रमंग्रासयो योजनेंतर्गत करण्यात आले असुन सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. सदरचा रस्ता दि.१३.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रजिमा ८६ म्हणून दर्जोन्नत झाला असून सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती आता सा.बां.विभागाकडे आहे.

पिंपळखुटा या गावाला जोडणारा रामा २२१ ते पिपळखुटा, कोयाळी, कारेगाव, खळेगाव ता.हद्द हा इजिमा क्र.१६८ लांबी १७.७० कि.मी. रस्ता आहे. पिपळखुटा गावापर्यंतची लांबी ४.०० कि.मी. असून साखळी क्र. २/२०० ते ४/०० पर्यंत १.८० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योलनेअंतर्गत करण्यात आले असून ही लांबी खड्डेविरहित सुस्थितीत आहे. सुरळीत वाहतुक सुरू आहे. सदरचा रस्ता दि.१३.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रजिमा ८७ म्हणून दर्जोन्नत झाला असून सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती आता सा.बां.विभागाकडे आहे.

वढव हे गाव प्रजिमा ४४ या रस्त्यावर असून सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती सा.बां.विभागाकडे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून वगळण्यात आलेल्या ७ पुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ११९९२१ (२४-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात सन २०१६-१७ अंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत व काही कामे प्रगतीत आहेत या रस्त्यांवरील ३० मिटरपेक्षा जास्त लांबींची ७ पुलांची कामे वगळण्यात आली असल्याने या पुलांच्या बांधकामाअभावी रस्त्यांचे डांबरीकरण होवूनही नागरिकांना त्याचा उपयोग होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्या पुलांची बांधकामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर पुलांचे सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त असल्यामुळे उपचारासाठी येणा-या रूग्णांची होत असलेली गैरसोय.**

**(३४) १२०२९५ (२८-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्यापही आरोग्य सेवक व सेविका तसेच इतर कर्मचा-यांच्या जागा रिक्त असल्यामुळे उपचारासाठी येणा-या रूग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील आरोग्य केंद्रात येणा-या रूग्णांना रिक्त असलेल्या पदांमुळे सेवा देण्यास अडचणी निर्माण होत असून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आरोग्य रक्षकांवर अवलंबून रहावे लागत आहे, ही ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, रायगड जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक कर्मचा-यांच्या एकूण जागांपैकी किती जागा भरल्या आहेत व किती जागा रिक्त आहेत ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रूग्णांना उत्तम आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य केंद्रात तात्काळ रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :**(१) नाही.
(२) नाही. कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचा-यामार्फत आरोग्य सेवा दिल्या जात आहेत.
(३) रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रसाठी ११५८ पदे मंजूर असून ७०६ पदे भरलेली आहेत व ४५२ पदे रिक्त आहेत.
(४) वित्त विभागाच्या दि. १६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेले निर्बधं उठविण्यात आलेले असून जुन्या आकृतीबंधानुसार १००टक्के पदभरती करण्यास प्रशासकीय विभागांना मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील काही ग्रामपंचायतींनी विकासकामे ई निविदेमार्फत न केल्याबाबत**

**(३५) १२०५९८ (२४-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायतींना विकासकामांकरीता लोकसंख्येनुसार विकास कामांसाठी वार्षिक लाखो रुपयांचा निधी उपलब्ध केला असून ५० हजारांवरील साहित्य खरेदी व ३ लाखांच्या पुढील विकासकामे ई-निविदेमार्फत काढणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयातील काही ग्रामपंचायतींनी शासनाच्या या निर्देशाचे पालन न करता निविदेचा नुसता फोर्स करुन कामे करण्यात आल्याचे माहे, एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव व उमरखेड ( जि.बुलढाणा) पंचायत समितीचे इमारत बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(३६) १२०९४७ (२४-०७-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव व उमरखेड (जि.बुलढाणा) पंचायत समितीचे इमारत बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ६ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे. (पंचायत समिती महागांव व उमरखेड यवतमाळ जिल्ह्यात येतात)

(२) महागांव व उमरखेड पंचायत समिती इमारत बांधकामाकरीता जिल्हा परिषदेने दिनांक १७.०३.२०१८ रोजी सादर केलेले प्रस्ताव परिपुर्ण नसून यात आढळून आलेल्या त्रुटी दिनांक ३१.०७.२०१८ व दिनांक ३०.०८.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेला कळविण्यात आल्या आहेत. सदर त्रुटींच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेले नाहीत.

परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापुर जिल्ह्यातील पंढरपुर पंचायत समिती कार्यालयामध्ये नागरिकांना प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३७) १२०९८७ (२४-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (ता.पंढरपुर, जि.सोलापूर) पंचायत समिती कार्यालयामध्ये नागरिकांना प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध नसून स्वच्छता गृहामध्ये दारूच्या बाटल्या व कचरा व अस्वच्छता असल्यामुळे कार्यालयामध्ये येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १४ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपुर पंचायत समिती कार्यालयामध्ये महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याचे नागरिकांनी अनेकदा तक्रारी करून ही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.
पंढरपुर पंचायत समिती कार्यालय आवारामध्ये महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध असून त्यावर महिला प्रसाधनगृह असा फलक लावण्यात आला आहे.
(३) व (४) पंढरपुर पंचायत समिती कार्यालय आवारामधील स्वच्छतागृहोची साप्ताहीक रित्या स्वतंत्र कामगारामार्फत स्वच्छता करण्यात येते. तसेच, आवारामध्ये नागरीकांना व अभ्यांगतांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे. पंचायत समिती आवाराची वर्ग ४ कर्मचाऱ्याकडून वेळोवेळी झाड लोट करुन स्वच्छता केली जाते.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कुंभोज येथील मध्यवस्तीत असणारी ग्रामपंचायत इमारतीची झालेली दुरवस्था**

**(३८) १२१२०२ (२४-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कुंभोज येथील मध्यवस्तीत असणारी ग्रामपंचायत इमारतीची दुरवस्था झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) कुंभोज येथील मध्यवस्तीत असणाऱ्या ग्रामपंचायत इमारतीची दुरवस्था झाल्यामुळे सदर ग्रामपंचायतीची इमारत निर्लेखित करण्याचा ठराव जिल्हा परिषदेने मंजूर केला आहे. सदर इमारतीचे निर्लेखन करुन इमारत पुर्णपणे नवीन बांधण्याचे नियोजन असून, नवीन इमारतीची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९३,१२,००१/- अशी आहे. यासाठी जिल्हा ग्रामविकास निधी मधून कर्ज स्वरुपात रक्कम रु. ६२,३४,०००/- व १४ व्या वित्त आयोगामधून उर्वरित रक्कम रु. २९,७८,००१/- ची तरतूद करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढर ते चिवेली बंदर (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील रस्त्याच्या कामाबाबत**

**(३९) १२२४६४ (३१-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंढर ते चिवेली बंदर (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) या ११ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामासाठी रुपये ६ कोटी ६४ लक्ष तसेच दुरुस्तीच्या कामासाठी ५१ लक्ष रुपयांची मान्यता देण्यात आली असून या कामाची निविदा काढण्यात आली असल्याचे मा. ग्रामविकास राज्यमंत्री यांनी निदर्शनास आणले असले तरी या कामाची निविदा अद्याप काढण्यांत आली नसल्याचे वा अद्याप एकही निविदा अंतिम करण्यात आली नसल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याच्या कामासाठी व दुरुस्तीच्या कामासाठी तात्काळ निविदा काढण्यासह निविदा काढण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कोकण विभागातील विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची आचारसंहिता दि.२०/४/२०१८ ते दि.२९/५/२०१८ व विधानपरिषद पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता दि.२४/५/२०१८ ते दि.२८/६/२०१८ पर्यंत असल्याने दुसरी निविदा प्रसिद्ध करता आली नव्हती. सदर निविदा दि.०३.०७.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

---

### बाळापूर तालुक्यातील (जि.अकोला) पंचायत समिती मधील विविध पदे रिक्त असल्याबाबत

**(४०) १२२५८८ (२४-०७-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोल) तालुक्यातील पंचायत समितीमधील मंजूर ७० महत्वाच्या पदांपैकी १२ पदे तसेच १९ ग्रामसेवक, ३ संगणक ऑपरेटर ही पदे रिक्त असल्याने तालुक्यातील शेतकरी व सर्व सामान्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यात अडचणी निर्माण होत आहेत त्याकरिता मासिक सभेत मंजूर रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याच्या मागणीचा ठराव करण्यात आल्याचे माहे एप्रिल मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय ?

(२) असल्यास उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुषंगाने तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासह रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :**(१) होय,
(२) होय,
चौकशीअंती ११६ भरतीयोग्य पदे असल्याचे निर्देशनास आले आहे.
(३) जिल्हा परिषद अकोला अधिनस्त कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्या मधुन रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपवून नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच वित्त विभागाच्या क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र २०/ आपुक दि.१६/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार पदभरती वरील निर्बंध वगळले असून जुन्या आकृतीबंधानुसार १००% पदे भरण्यास मान्यता दिली आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील बोरगाव वैराळे- अंदुरा या ६ किमी रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(४१) १२२६१३ (३०-०७-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील बोरगाव वैराळे- अंदुरा या ६ किमी लांब रस्त्याचा समावेश मुख्यमंत्री ग्राम सड़क योजनेत केला असून तात्काळ खडीकरण व डांबरीकरण करण्यात येईल असे योजनेचे उपकार्यकारी अभियंता यांनी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर कामास शासन निर्णय क्र. मुग्रायो २०१८/प्र.क्र.५८४/बांध-४, दि.२८/६/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सद्यस्थितीत कामाची निविदा प्रक्रीया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील कल्याण तालुका पंचायत समितीचे कार्यालय अतिधोकादायक झाल्याने कार्यालयाचे स्थलांतर करण्याबाबत**

**(४२) १२२६९७ (३०-०७-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुका पंचायत समितीचे अस्तीवातील कार्यालय अतिधोकादायक झाल्याने सदरचे कार्यालय मौजे गोवेली येथे स्थलांतरित करण्याबाबत मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व कल्याण तालुका पंचायत समिती कार्यालय गोवेली येथे स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) कल्याण तालुका पंचायत समितीचे कार्यालय गोवेली येथे स्थलांतरीत करणे नागरीकांना सोयीचे नसल्यामुळे तसे न करण्याचा निर्णय जिल्हा परिषद ठाणे बैठकीत घेण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत पंचायत समिती कल्याण इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटनुसार धोकादायक असलेला ३० % भाग पाडण्याचे व उर्वरित ७०% इमारतीच्या भागाचे दुरुस्तीचे व मजबुतीकरणाचे काम तात्काळ सुरु करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस देवघर या रस्त्याच्या नुतनीकरणाचे व पुलाच्या उभारणीच्या कामास विलंब लागत असल्याबाबत**

**(४३) १२३६१० (३१-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस-देवघर या अंतर्गत रस्त्याच्या नुतनीकरणाचे व देवघर गावाच्या हद्दीत छोट्या पुलाच्या उभारणीचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या रस्त्याच्या कामाच्या निकृष्ट दर्जाकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक प्रतिनिधींनी उपोषणही केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे व पुलाचे काम करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधीत कंत्राटदार व अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) शासनाने नेमूण दिलेल्या राज्य गुणवत्ता निरीक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या मार्फत आंदोलन कर्त्यासमोर कामाच्या गुणवत्तेची तपासणी केली. सदर तपासणीमध्ये कोणताही गंभीर मुद्दा निदर्शनास आला नाही. यास्तव संबंधीत कंत्राटदार व अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येळवडी-शाहुवाडी (ता.शाहुवाडी,जि. कोल्हापूर) रस्त्यावरील संरक्षक कठड्याचे बांधकामा करण्याबाबत**

**(४४) १२४२८४ (२०-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळवडी-शाहुवाडी (ता.शाहुवाडी,जि. कोल्हापूर) हा रस्ता शाहुवाडी तालुक्याच्या पश्चिम भागातील नागरीकांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी अत्यंत जवळचा व महत्वाचा रस्ता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावर मोठया प्रमाणात रहदारी असून या मार्गावर नवीन संरक्षक कठडा बांधण्याचे काम अद्यापि पूर्ण झाले नसल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार या रस्त्यावरील संरक्षक कठड्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

सदर मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक असून साखळी क्र.१७/५०० मध्ये संरक्षक भिंत बांधण्याचे काम सुरु असून एकूण ४०.०० मी. लांबीची संरक्षक भिंत बांधून पूर्ण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथील जिल्हा परिषदेची इमारत धोकादायक असल्याबाबत**

**(४५) १२४४४२ (३०-०७-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या आग सुरक्षेच्या परिक्षणामध्ये आणखी आगीच्या यंत्राचा आवशक्यता असल्याचे अहवालामध्ये नमुद केला असून ही जिल्हा परिषदेची इमारत धोकादायक असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये अनेक वेगवेगळया विभागाचे जिल्हा कार्यालय आहेत त्यामुळे या इमारतीमध्ये जिल्ह्यातील नागरिकांची मोठया प्रमाणावर वर्दळ असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हा परिषदेची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा परिषदेच्या इमारतीचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हिंगोली जिल्हा परिषदेची पाहणी शासनाने नोंदणीकृत केलेल्या अभिकरणामार्फत करण्यात आलेली आहे. व अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिरक्षण करुन घेण्यात आले आहे. हिंगोली जिल्हा परिषदेच्या इमारतीमधील अग्निरोधक नुतनीकरण उपाययोजना करण्याकरीता जिल्हा परिषदेने अंदाजपत्रक मागविले असून निधी उपलब्धतेसाठी पुढील कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४६) १२५३३७ (३०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणा-या रस्त्याची खडीकरण व डांबरीकरणाची कामे १५ मे नंतर बंद करणे आवश्यक असतांना, सिंधुदुर्ग जिल्हयात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांची डांबरीकरण करण्याची काम माहे जून, २०१८ पर्यत चालू असल्याने तसेच बनावट कामे करित असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी ही कामे थांबिवली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर झालेल्या आयी-तळेखोल वझरे. कीटवाडी या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मुदत संपल्यानंतर भर पावसाळयात डांबरीकरण केले जात होते तसेच पाहणीकरिता कुणीही संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी हे काम थांबविले आहे, हे ही खेर आहे काय,
(३) असल्यास, डांबरीकरण करण्याची मुदत संपल्यांनतर भर पावसाळयात डांबरीकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या संबधित कंत्राटदार व पाहणीकरिता उपस्थित नसणा-या अधिका-यांवर कारवाई करावी अशी तक्रार कस्तुरीमृग फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. अनुपम कांबळी यांनी माहे जून, २०१८ मध्ये जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने SQC कार्यालय पुणे यांनी सदर कामाची SQM मार्फत दि. ०५.१०.२०१८ रोजी पाहणी केली असुन त्याचा अहवाल SQC कार्यालय पुणे यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिवाळे (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासभोवातालच्या संरक्षण भिंतीची अंदाजपत्रकीय रक्कम दलदल जमीन दर्शवून वाढविल्याबाबत**

**(४७) १२६२७२ (३१-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवाळे (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रा सभोवतालीच्या संरक्षण भिंतीची अंदाजपत्रकीय रक्कम दलदल जमीन दर्शवून प्र. उप अभियंता व कनिष्ठ अभियंता, बांधकाम (उपविभाग), मालवण,जि.प., सिंधुदुर्ग यांनी फसवणूक केली असल्याची बाब दिनांक ०१ जून,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामाची पाहणी तथा त्रयस्थ पक्षामार्फत तांत्रिक लेखा परीक्षण शासनाने करण्यात आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केल वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२),(३),(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वैताकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील गट नंबर २० व गट नंबर २८ या ठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.मा. यशवंतनगर ते तुडीये रस्त्यांची दुरुस्ती विनापरवाना केल्याबाबत**

**(४८) १२६२८७ (३१-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्ता करताना तो रस्ता ज्यांच्या जमिनीतून जातो त्या जमीनमालकांचे संमतीपत्र घेणे संबंधित अधिका-यांवर बंधनकारक असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे वैताकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे गट नंबर २० व गट नंबर २८ याठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.मा. यशवंतनगर ते तुडीये रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन ही सौ. सुनिता मदन सामंत यांचे खाजगी मालकीची असताना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिका-यांनी त्यांच्याकडून कोणतेही संमतीपत्र न घेता संबंधित रस्त्याचे काम केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या संबंधित अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी तक्रार लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या सचिवांकडे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) सदर रस्ता पुर्वापार अस्तित्वातील व वहीवाटीचा असुन त्याचा समावेश १९६१-८१, १९८१-२००१ च्या रस्ते विकास आराखडा सुचित असल्याने सदर रस्त्याकरीता संमतीपत्र घेण्याची आवश्यकता नाही.
(२) होय,हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) होय,हे खरे आहे.
सदर रस्ता पुर्वापार अस्तित्वातील व वहीवाटीचा असल्याने संमतीपत्र घेण्याची आवश्यकता नाही.त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डिजिटल इंडियाची घोषणा देत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीचे जमाखर्च ऑनलाईन पध्दतीने प्रिया सॉफ्टवेअरमध्ये भरण्याबाबत

**(४९) १३०२८३ (०७-१२-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने डिजिटल इंडिया ची घोषणा देत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीचे जमाखर्च ऑनलाईन पध्दतीने प्रिया सॉफ्टवेअरमध्ये भरण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी नसल्याचे कारण पुढे करता कोल्हापूर जिल्हयातील अनेक तालुक्यात लेखेच अद्यावयात केले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्याकडील लेखे अद्यावत करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्यास्तरावर आढावा घेऊन उपलब्ध मनुष्यबळाद्वारे लेखे अद्यावत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व ग्रामपंचायतींना गट विकास अधिकारी यांच्यामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील लेख्यांची माहिती अद्यावत करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १५ मार्च, २०१८ अन्वये तांत्रिक मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास व त्यांच्यामार्फत लेखे अद्यावत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. लेखे अद्यावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असलेले खिरोदा-जानोरी रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५०) १३०९४३ (१०-१२-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असलेल्या खिरोदा-जानोरी रस्त्याचे काम सन-२०१४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून सदर काम अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यासह रस्त्याचे काम प्रलंबित ठेवणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :**(१) हे खरे नाही.

सदर काम दि.३०/०६/२०१८ रोजी पूर्ण झाले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत  नाही.

(३) व (४) सदर कामास मक्तेदाराने विलंब केल्यामुळे दि.०१/०४/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ पर्यंत रु.४९,२४०/- प्रति आठवडा दंड लावण्यात आला होता.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.